# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ७०-२३** **दिनांक :- ०२/०३/२०२३**

## बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करुन महिलेचे खाजगी फोटो व व्हिडीओ प्रसारित करणाऱ्या आरोपीस अटक करण्यात सायबर गुन्हे शाखेस यश.

सायबर गुन्हे शाखा मि.भा.व.वि. यांना महाराष्ट्र सायबर शाखेकडुन महिलेची निनावी तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीमध्ये महिला तक्रारदार यांचे खाजगी फोटो व व्हिडीओ अश्लील बनावट INSTAGRAM ID तयार करुन प्रसारीत केले असल्याचे नमुद होते. सदर बाबत महिला हिने तिचे मनास लज्जा उत्पन्न केलेबाबत नमुद केलेले होते. सदरची तक्रार ही Child Pornography (CP)-Child Sexual Abuse Material (CSAM) या प्रकारची होती.

सदर तक्रारीबाबत सायबर गुन्हे शाखा यांनी तांत्रिक विश्लेषण करुन बनावट INSTAGRAM ID तयार करून अश्लिल व्हिडीओ व फोटो पाठविणारा अरोपीत नामे प्रतिश कोठारी, रा. ठाणे याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले असता त्याचेकडे केलेल्या चौकशीत नमुद तक्रारी अर्जातील निनावी महिलेचा शोध घेतला व तिने दिलेल्या तक्रारीवरुन वर नमुद आरोपीविरुध्द नयानगर पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्रमांक १३४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३५४ (ड) (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ सी, ६६ डी, ६७ बी प्रमाणे दिनांक २५/०२/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपीतास अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास नयानगर पोलीस ठाणेत सुरु आहे.

### असा प्रकार घडू नये याकरीता घ्यावयाची काळजी...

- आपली खाजगी माहिती, फोटो, व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारीत करु नये.
- अनोळखी Request प्राप्त झाल्यास खात्री करुनच Accept करावी.
- आपले Socia Media Account -Login I.D. , Password, OTP कोणाशीही शेअर करु नये.
- आपले Socia Media Account हे नेहमी Private Setting याप्रमाणे ठेवावे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणीही खाजगी फोटो, अश्लिल फोटो प्रसारीत करीत असल्यास त्याबाबत www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार दयावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, स.फौ. संतोष चव्हाण, पोलीस अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंम. सुवर्णा माळी यांनी केली आहे.

**-------000--------**